THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 20TH NOVEMBER 1890.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्तान सरकार.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन कौन्सिल यांचा खालीं दिलेला आक्ट आलीजनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख १६ माहे आक्टोबर सन १८९० रोजीं मंजूर केला; तो लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे:—

### सन १८९० चा आक्ट १८ वा.

**सन १८८३ चा हिंदुस्तानचा देशनिर्गमनाविषयीं आक्ट सुधारण्याबाबत आक्ट.**

खालीं निर्दिष्ट केल्याप्रमाणें सन १८८२ चा हिंदुस्तानचा देशनिर्गमनाबाबत आक्ट सुधारणें ज्याअर्थीं योग्य आहे, त्याअर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

१. सदर्हू आक्टाच्या ३१ व्या कलमांत, "वळविलेलें नाहीं," या शब्दांनंतर "आणि" हा शब्द दाखल करावा.

सन १८८३ चा आक्ट २१ वा, कलम ३१, याची दुरुस्ती.

२. (१) सदर्हू आक्टाचें कलम ३९, पोट-कलम (१) यांत ज्या दोन ठिकाणीं "तीन प्रती" हे शब्द आले आहेत, त्या दोन्ही ठिकाणीं "तीन प्रती" या शब्दांच्या ऐवजीं "दोन प्रती" हे शब्द दाखल करावे.

सन १८८३ चा आक्ट २१ वा, कलम ३५, याची सुधारणा व त्यांत जास्त मजकूर दाखल करणें

(२) त्याच कलमांत, खालीं दिलेलें पोट-कलम जास्त दाखल करावें:—

"(४) देशनिर्गमन करण्याचा इरादा असलेले कितीहि मनुष्य एकाच वेळीं एकाच भरती करणाराबरोबर नोंदणाऱ्या अमलदारापुढें अगर संरक्षकापुढें हजर होऊन सारख्या शर्तींवर एकाच देशास निर्गमन करण्याची इच्छा प्रदर्शित करतील तर, त्यांस, प्रसंगाप्रमाणें, त्या नोंदणाऱ्या अमलदाराची अगर संरक्षकाची परवानगी घेऊन, प्रत्येकानें निरनिराळ्या कबुलायतीवर सही करण्याच्या ऐवजीं, या कलमाखालीं एकाच कबुलायतीवर सह्या करून देण्याचा अख्त्यार आहे."

सन १८८३ चा आक्ट २१ वा याच्या ३७ व्या कलमाऐवजीं नवीन कलम दाखल करणें.

नोंदी व कबुलायती दप्तरांत दाखल करणें.

३. सदर्हू आक्टाच्या ३७ व्या कलमाऐवजीं खालीं दिलेला मजकूर दाखल करावा : तो येणेंप्रमाणें :—

"३७. कबुलायतीवर सही व साक्ष झाली म्हणजे—

(अ) तिची एक प्रत देशनिर्गमनीस द्यावी व दुसरी संरक्षकानें ठेवून घ्यावी किंवा नोंदणाऱ्या अमलदारानें त्याकडे पाठवावी, आणि

(ब) ज्या देशनिर्गमनीनें अगर देशनिर्गमनींनीं त्या कबुलायतीवर सही केली असेल, त्याच्या अगर त्यांच्या संबंधाचा आणि त्याचे अगर त्यांचे आश्रित असल्यास त्यांच्या संबंधाचा जो तपशील कलम ३१ अन्वयें नोंदण्यांत येईल, त्या तपशिलाची, खरी असल्याबद्दल दाखला दिलेली एक प्रत, देशनिर्गमनाबाबदच्या एजंटाकडे पाठविण्यासाठीं भरती करणारास दिली पाहिजे."

सन १८८३ चा आक्ट २१ वा याच्या ४९ व्या कलमाची सुधारणा.

४. सदर्हू आक्टाचें कलम ४९, पोट-कलम (१), यांत, "कबुलायतीची" या शब्दाबद्दल "कलम ३१ अन्वयें नोंदलेल्या तपशिलाची" हा मजकूर दाखल करावा; आणि त्याच कलमाच्या २ ऱ्या पोट-कलमांत "कबुलायतींत" या शब्दाच्या ऐवजीं "सदर्हू नकलींत" हे शब्द दाखल करावे.

सन १८८३ चा आक्ट २१ वा, कलम ५६ (१), यांत एक विशेष ठराव दाखल करणें.

५. सदर्हू आक्टाचें कलम ५६, पोट-कलम (१), यांत खालीं दिलेला विशेष ठराव दाखल करावा: तो येणेंप्रमाणें :—

"मात्र इतकेंच कीं, तें तारूं आगबोट असून त्याला बोर्ड आफ् ट्रेड यानें अगर कोणत्याहि ब्रिटिश वसाहतीच्या सरकारानें अगर सन १८८४ चा हिंदुस्तानी आगबोटींविषयींचा आक्ट याअन्वयें पाहाणीचा दाखला दिलेला असला, आणि तो दाखला अमलांत असून जो सफर करण्याचें योजिलें असेल तिला लागू असला, तर, तो दाखला दिल्यानंतर त्या तारवाचा सांगाडा अगर यंत्रें यांस इजा झालेली आहे अगर त्याचें नुकसान झालेलें आहे अगर इतर रीतीनें तीं काम करण्यास निरुपयोगी झालेलीं आहेत असें मानण्यास देशनिर्गमनींच्या संरक्षकास कारण असेल ते प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, तें तारूं जोंळी आहे किंवा नाहीं हे समजण्याकरितां या पोट-कलमाअन्वयें करावयाच्या पाहाणीमध्यें त्या तारवाच्या सांगाड्याचा अगर यंत्रांचा समावेश करूं नये."

सन १८८३ चा आक्ट २१ वा, कलम ७०, हें रद्द करणें.

६. सदर्हू आक्टाचें कलम ७० हें यावरून रद्द केलें आहे.

सन १८८३ चा आक्ट २१ वा, कलम १०२, याऐवजीं नवीन कलम दाखल करणें.

या आक्टाचें कलम ६ (१) यास पुरवणीदाखल ठराव.

७. सन १८८४ चा आक्ट २१ वा यावरून सुधारलेलें सदर्हू आक्टाचें कलम १०२ याऐवजीं खालीं दिलेला मजकूर दाखल करावा: तो येणेंप्रमाणें:—

"१०२. (१) स्ट्रेट्स सेटलमेंटस यांलगत असणाऱ्या कोणत्याहि संरक्षित देशी संस्थानाच्या संबंधानें अगर मजुरांकरितां राखलेल्या ज्या कोणत्याहि ब्रिटिश वसाहतींत अगर मुलुकांत हिंदुस्तानचे देशी मनुष्य केवळ स्ट्रेट्स सेटलमेंटच्या सरकारामार्फत भरती केले जात असतात, त्या वसाहतीच्या अगर मुलुकाच्या संबंधानें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे इंडिया गझेटांत जाहिरनामा देऊन या बाबतींत जी तारीख नेमतील त्या तारिखेस व त्या तारिखेपासून हिंदुस्तानचा जो कोणताहि देशी मनुष्य तशा कोणत्याहि संस्थानांत, वसाहतींत अगर मुलुकांत मुशारा घेऊन मजुरी करण्याच्या कबुलायतीअन्वयें ब्रिटिश इंडियांतून समुद्रमार्गानें जाईल, तो, तो जाहिरनामा त्या संस्थानास, वसाहतीस अगर मुलुकास लागू राहील तोंपर्यंत, या आक्टाच्या अर्थाप्रमाणें देशनिर्गमन करितो असें समजूं नये.

(२) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस इंडिया गझेटांत जाहिरनामा देऊन असें जाहीर करण्यास अधिकार आहे कीं, त्या जाहिरनाम्यांत निर्दिष्ट केलेल्या देशी संस्थानास अगर ब्रिटिश वसाहतीस अगर मुलुकास, पोट-कलम (१) अन्वयें दिलेला जाहिरनामा अमुक तारिखेपासून लागू राहणार नाहीं."

सन १८८४ चा आक्ट २१ वा यावरून सुधारलेला सन १८८३ चा आक्ट २१ वा. कमल १०२, याअन्वयें दिलेल्या जाहिरनाम्यांचा बचाव.

८. सन १८८४ चा आक्ट २१ वा यावरून सुधारलेलें सदर्हू आक्टाचें कलम १०२ याअन्वयें दिलेला कोणताहि जाहिरनामा, या आक्टाच्या गेल्या शेवटल्या कलमाबरहुकुम सुधारलेलें त्या आक्टाचें कलम १०२, पोट-कलम (१), याअन्वयें दिलेला आहे असें समजावें.

सन १८८३ चा आक्ट २१ वा याच्या १०५व्या कलमाची सुधारणा.

९. सदर्हू आक्टाचें कलम १०९ यांत "एकशें दुसऱ्या कलमांत" या शब्दांच्या ऐवजीं "कलम १०३, रकम (अ), आणि कलम १०४ यांत" हा मजकूर दाखल करावा.

(सही.) एस् हार्वे जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्तान सरकार.

(True Translation.)
Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.